कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) गट-क या संवर्गातील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**सामान्य प्रशासन विभाग-१**

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/६२९/२०२६

अहिल्यानगर दिनांक २५/०६/२०२६

**वाचा** - १. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एपिटी/प्र.क्र.१०००/ प्र.क्र.२०२५/आस्था-८ दिनांक ०५/०६/२००३.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ९ (३)

३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दिनांक ०१/०८/२०१९.

४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१.

५. पदोन्नती समिती इतिवृत्त दिनांक १०/११/२०२५

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर वेतनस्तर रुपये **एस-०८ २५५००-८११००** मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहुन खालील रकाना क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्र.४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

| अ.नं | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री.विजय अशोक आढाव | पंचायत समिती कोपरगाव | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती कोपरगांव |
| २. | श्री.जगदीश शांताराम पवार | पंचायत समिती अकोले | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती अकोले |
| ३. | श्रीम. संगिता अरविंद बनकर | जि.प.सा.बा दक्षिण विभाग अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | शिक्षण (प्राथमिक) जि. प. अहिल्यानगर |

**अटी व शर्ती –**

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.

२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

..२

३. शासन निर्णय दिनांक ०१/०४/२०१०, दिनांक ०२/०३/२०१९ व शासन परिपत्रक दिनांक २८/०७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४. नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने १५ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा जेष्ठता डावलली जाईल.

६. सदरच आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202606250401117 असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.विजय अशोक आढाव, कनि सहा, पंचायत समिती कोपरगाव
२. श्री.जगदीश शांताराम पवार, कनि सहा, पंचायत समिती अकोले
३. श्रीम. संगिता अरविंद बनकर, कनि सहा, जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर

द्वारा व प्रत :- संबंधित खातेप्रमुख/ कार्यालय प्रमुख

२/- उक्त नमुद केलेप्रमाणे आपले कार्यालयाचे अधिनिस्त कार्यरत कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी त्यांचेकडील कार्यभारासंबधी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे.

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत:- ..................................................................................
प्रत:- निवड नस्ती.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर